श्रावणराज

ग्रीष्माचा दाह धरित्री सोसते, पण ही काहीली सहनच होत नाही, धरित्री 'बरस रे घना, बरस रे घना' अशी आर्त प्रार्थना आकाशाकडे पाठवत करते. वसुंधरेच गात्र न गात्र पर्जन्याच्या थेंबासाठी तृषार्त होतं. वातावरणही मग पावसाळी होवू लागतं, अन पुरवाद्या इकव्या झणी कृष्णवर्णीय, श्यामल मेघ प्रचंड गर्जना करीत जलधरातून संजीवक स्नेहस्त्रोत बरसतात. पर्जन्य मातीतच रुजतो आणि धरही मरमरून प्रसन्न होते, मृद्गंधीत होते.

पावसाच्या स्पर्शाचे चिंब भिजलेपण वर्षा ऋतु देतो. साऱ्या सृष्टीचे रूपच पालटते. आणि नाविन्याचे पोतु घेवून श्रावण दारात होतो. आकाश, होती, वसुंधरा, गगनपाती, वृक्ष, फुले आणि हिरव्याकंच कोंदणातून फुलणारे अंकुर सारेच श्रावणाच्या सुर, ताल, लयीत डोलायला लागतात. पुंकाच हिरव्या रंगाच्या असंख्य रंगछटा निसर्ग मुक्तहस्ताने रीक्स करीत असतो. मानवी मनही संमोहित होवून जाते.

आकाशात सप्तरंगी इंद्रधनुष्य, डोंगर कपारीतून वाहणारे प्रपात, तरंगणारे ढग, पानांवरील दवबिंदू, रंगीबेरंगी फुलांचा बहर श्रावणातच पाहायला मिळतो. श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र 'श्रवण' नक्षत्रात असतो म्हणून या महिन्याला श्रावण म्हणतात. श्रावण म्हणजे पुंकणे. श्रावण म्हणजे अवनी. धरतीकन्येचा; मांगल्याचा सत्कार देणारा हा श्रावण कृषीजनांचा, गोरवाचा, कृतज्ञतेचा, अतूट बंधनाचा तसेच आकाश-धरतीच्या मिलनाचा दुलच असतो.

श्रावण म्हणजे मुग्ध बालपण, तारुण्यातील स्त्रीचा साजशृंगार, बरसणारा घन, सुगंधी वन आणि आनंदी मन ह्यांचे सौन्दर्य देणारा ऋतु आहे. हा ऋतुराज सृष्टीतील चैतन्यदायी, सर्जनशिलतेच्या अविष्कारातून मानवी जीवनाला आशा आकांक्षेची प्रेरणा देतो. मनातील उल्हास फुलवतो. श्रावणातील इन पावसाप्रमाणे मानवी जीवनातही आशा-निराशा, सुख दुःख, यश अपयश असो अनेक हिंदोळे येतात. म्हणूनच श्रावण म्हणजे उपभोगच नव्हे तर श्रावण म्हणजे जीवन रीत !! निसर्गाशी जवळीक साधण्याची कला आहे. सर्जनशिलतेचा अविष्कार आहे !!

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.